## दाटून आलेला पाऊस

दाटून आलेला पाऊस
मला न सांगताच
आला नि गेला
इतका दुखावलेला.
कुठल्याशा नखाएवढ्या
जखमेची भळभळ
अजून नाही थांबलेली
परत परत नख लावून
खोल आतून चिघळलेली.
दारावरची टकटक
कंटाळून परतली,
जाताना गेल्या पावली
तिच्याही नकळत
पावसापाशी घुटमळली.
ऋतू सरला तरी
ओलेते, मौन आभाळ
अजून ही ठिबकत राहते
थेम्ब थेम्ब दवाने
पुन्हा जरा हळहळते.

**-----संध्या रानडे**